RIGHT TO INFORMATION

# महापारेषण

प्रेषक :-

कार्यालय :- कार्यकारी अभियंता, 400 के.व्ही. ग्रहण केंद्र विभाग कुंभारगाव.

कार्यालयाचा पत्ता :- नांदेड – हैदराबाद महामार्ग मारतळा जवळ, कुंभारगाव ता.लोहा जि. नांदेड. – 431602

पोस्ट शिवाजी नगर नांदेड. संपर्क :- 8554995329

सिआयएनक्रं. U40109MH2005SGC153646

ई – मेल :- ee2270@mahatransco.in

जा.क्र. काअ/400 के.व्ही. ग्र.के.वि/कुंभारगाव/मासं/ 24 = दिनांक : - 3 FEB 2026

## जाहीर नोटीस

महापारेषण **कार्यकारी अभियंता, ४०० के.व्ही.ग्रहण केंद्र विभाग,कुंभारगाव ता.लोहा जि. नांदेड** अंतर्गत शिकाऊ उमेदवारी कायदा १९६१ नुसार शिकाऊ उमेदवार म्हणून सन २०२६-२०२७ करीता विजतंत्री (Electrician) या ट्रेंड मध्ये भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

२. सदर शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी शासनाच्या www.apprenticeshipindia.orghttp://apprenticeshipindia.gov.inapprenticeship/opprutunity या संकेतस्थळावर **कार्यकारी अभियंता, ४०० के.व्ही.ग्रहण केंद्र विभाग,कुंभारगाव ता.लोहा जि. नांदेड** च्या खालील आस्थापना रजिस्ट्रेशन क्रमांकावर ऑनलाईन अर्ज सादर करणे गरजेचे आहे. ऑनलाईन अर्ज सादर करण्याची दिनांक ०४.०२.२०२६ रात्री ००:०० पासून अंतिम मुदत दिनांक ११.०२.२०२६ रात्री ११:५९ पर्यंत राहील. त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा शिकाऊ भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. विजतंत्री (Electrician) शिकाऊ उमेदवारांचा प्रशिक्षण कालावधी हा अधिनियमा नुसार १ वर्षाचा राहिल. ऑनलाईन अर्जासाठी आवश्यक माहिती खालील अस्थापनेच्या नावे नोंदनी क्रमाकांवर करणेत यावी.

| आस्थापने चा रजिस्ट्रेशन क्रमांक | ट्रेड | एकुण |
|---|---|---|
| **४०० के.व्ही.ग्रहण केंद्र विभाग, कुंभारगाव**<br>**अस्थापना कोड** E05202701611 | **विजतंत्री (Electrician)** | **एकुण जागा-(८)** |

१. शैक्षणिक अर्हता :-महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे व राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCTVT) नवी दिल्ली मान्यता प्राप्त औदयोगिक प्रशिक्षण संस्थेतून वीजतंत्री या व्यवसाय परीक्षेत उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

२. विद्यावेतन शासनाच्या नियमाप्रमाणे लागु राहील.

३. पदसंख्या कमी किंवा जास्त करण्याचा व भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले सर्व निर्णय घेण्याचा अधिकार व्यवस्थापनाकडे राखीव असतील व सदरचे निर्णय उमेदवारास कळविणे व्यवस्थापनास बंधनकारक राहणारनाही. भरती प्रक्रियेचे ठिकाण अउदा संवसु मंडळ, परळी वै.

४. शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी आरक्षण शासनाच्या विविध नियमांनुसार लागु राहील.

५. ऑनलाईन अर्ज सादर करताना एस.एस.सी. उत्तीर्ण गुणपत्रिका व आयटीआय उत्तीर्ण गुणपत्रिका यामध्ये नमुद केलेले नाव व आधार कार्डवर नमुद केलेल्या नावाशी सुसंगत आहे किंवा कसे\याची पडताळणी करुन माहीती भरावी.

६. एस.एस.सी. गुणपत्रक / प्रमाणपत्र व आयटीआय उत्तीर्ण गुणपत्रक / प्रमाणपत्र (चारही सेमिस्टरची) साक्षांकिंत प्रत व शाळा सोडल्याचा दाखला ऑनलाईन अर्जामध्ये अपलोड करणे आवश्यक आहे.

७. शिकाऊ उमेदवाराची सही, पालकाची सही, प्रवर्ग, जन्मतारीख, एस.एस.सी.मार्क, आयटीआय मार्क ही माहिती अचुक भरण्यात यावी. सदर माहिती उपलब्ध न झाल्यास उमेदवारांच्या शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही.

८. या भरती प्रक्रियेमध्ये जे उमेदवार त्यांचा अर्ज परिपूर्णपणे वेबसाईट वर भरतील अशाच उमेदवारांचा तात्पुर्ती (Provisional) गुणवत्तेसाठी विचार केला जाणार असून, त्यामधील कागदपत्रे पडताळणी करीता गुणवत्तेतील फक्त १०० (आपल्या विभागाच्या मंजुर पदानुसार एकास तीन याप्रमाणे संख्या देण्यात यावी) उमेदवांराना अंतिम निवडीसाठी उपरोक्त कार्यालयीन पत्यावर ठिक सकाळी ११.०० वाजता उपस्थित राहणे बाबत, विजकीय संदेशाव्दारे सुचित करण्यात येईल. त्याच बरोबर ज्या उमेदवारांनी आस्थापणा कोडवर नाव नोंदनी केलेली आहे परंतू अंतिम निवडी साठी बोलविलेले नाही त्यांची गुणवत्ता यादी त्यांच्या मेलवर उमेदवारांच्या माहिती करीता पाठविण्यात येईल, जेणे करुन उमेदवारांकडून अधिक ची चौकशी अथवा पत्र व्यवहार करावा लागणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

९. सदर प्रक्रियेमध्ये विभागाच्या कार्यक्षेत्रातील उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.

१०. शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रिये दरम्यान शिकाऊ उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिका-यांकडून दबाव आणल्यास संबंधित उमेदवाराची उमेदवारी रदद करणेत येईल याची नोंद घ्यावी.

११. शिकाऊ उमेदवारांनी ऑनलाईन (Online) अर्ज करतांना पोर्टल वर फोटो, मुळ प्रमाणपत्रांची सुस्पष्ट स्कॅन करुन योग्य रितीने ऑनलाईन (Online) अर्ज सादर करावा. फोटो अथवा मुळ प्रमाणपत्र सुस्पष्ट नसेल तर अशा अर्जांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

१२. प्रशिक्षण घेऊ ईच्छिणा-या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण कालावधीत कोणताही तंत्रनिकेतन किंवा अभियांत्रिकी महाविद्यालयात पदविका / पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला नसावा. वरील कागदपत्रे अपलोड न केल्यास नोंदणी धारकांना पुढील प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही. निवड झालेल्या उमेदवारांना ई-मेलव्दारे कळविण्यात येईल. तरी कोणीही महापारेषण कार्यालयास भेट देवू नये. तसेच जाहीरातीमध्ये किंवा जाहिरातीच्या काही भागांमध्ये अंशत: बदल किंवा संपूर्ण जाहीरात रदद करण्याचे अधिकार हे कंपनी राखून ठेवत आहे. सदर बाबतीत कुठल्याही प्रकारचा अधिकचा पत्रव्यवहार व या अनुषंगाने कोणतिही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. या भरतीमध्ये राजकिय दबाव आणल्यास सदर उमेदवारास भरती प्रक्रियेतून रदद बादल करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

१३. वयोमर्यादा १८ ते ३० वय वर्षे (मागासवर्गीयांसाठी ०५ वर्षे शिथिल क्षम)

१४. ऑनलाईन (Online) अर्ज सादर करताना उमेदवाराने सदय स्थितीत कार्यान्वित असणारा Email-ID व भ्रमनध्वनी क्रमांक कार्यान्वित नसल्यामुळे संपर्क करणे शक्य झाले नाही तर त्याची पूर्ण जबाबदारी उमेदवारांवर राहील.

१५. दि. ११.०२.२०२६नंतरऑनलाईन नोंदणी केलेल्या उमेदवारांचा शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

१६. आरक्षणाचा लाभ घेणा-या उमेदवारांना ऑनलाईन अर्जासोबत जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच या कार्यालयाने मागणी केल्यास शासकीय नियमाप्रमाणे आरक्षणा संबंधित कागदपत्रे सादर करणे उमेदवारास बंधनकारक राहील.

१७. शिकाऊ उमेदवारीचा प्रशिक्षण कालावधी पुर्ण केल्यामुळे कंपनीमध्ये नोकरी मिळवण्याचा कोणताही अधिकार प्राप्त होत नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

१८. निवड झालेल्या उमेदवारांनी जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या कडून वैद्यकिय दाखला देणे बंधनकारक आहे.तसेच निवड झालेल्या प्रत्येक उमेदवाराने (पोलिस पाटील, मुख्याध्यापक, नगरसेवक, सरपंच यांच्या स्वाक्षरीचे) चारित्र प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

१९. कागदपत्रे तपासणी किंवा शिकाऊ उमेदवार म्हणुन हजर होण्याकरीता कोणत्याही रक्कमेची पुर्तता कंपनी देनार नाही.

२०. प्रशिक्षण कालावधी मध्ये कोणतीही निवास व्यवस्था कंपनीकडुन मागणी करता येणार नाही.

कार्यकारी अभियंता
४०० केव्ही ग्रहण केंद्र विभाग कुंभारगाव